# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | मंगळवार, दि. १० मार्च २०२६ | वर्ष २ रे | अंक ११८ | किंमत : ५ रु. | पाने ४


**दिन विशेष...**

१६१५ : मोघल साम्राज्याचा कडवा, धर्मवेडा बादशहा औरंगजेब याचा जन्म.

१८९७ : सावित्रिबाई फुले यांचा मृत्यू.

१९५२ : पिंपरी येथे हिंदुस्थान अँटिबायोटिक्स या पेनिसिलिन कारखान्याचे काकासाहेब गाडगीळ यांच्याहस्ते उद्घाटन.

१९६९ : अतिशय हुषार व धाडसी वृत्तीची महिला गोल्डा मायर यांची इस्त्राईलच्या पंतप्रधानपदावर नियुक्ती झाली.

| | | |
|---|---|---|
| सेन्सेक्स | ७७,५६६.१६ | -१,३५२.७४ (१.७१%) |
| डॉलर | ₹ ९२.२६ | |

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ४० | १८ |
| दिल्ली | ३५ | २० |
| मुंबई | ३९ | २४ |
| नागपूर | ३७ | २० |
| पुणे | ३९ | १४ |

**सुविचार**

आयुष्यातील सर्वात मोठी शिकवण म्हणजे आपल्या चुका. त्यांना स्वीकारून, आपण उद्याच्या यशाची तयारी करतो.

| सुर्योदय | सुर्यास्त |
|---|---|
| स.-६:४१ | संध्या-६:३५ |

**सोने – चांदी**

| सोने(१० ग्रॅम) | चांदी (प्रति किलो) |
|---|---|
| १,६३,८२५/- | २,८०,०००/- |

**केळी भाव**

नवती : ---- ते ----

पिल बाग : ---- ते ----

कांदे बाग : ----

# ‘ब्रह्मोस’चा जगात डंका!

## भारताकडून इंडोनेशिया खरेदी करणार ब्राह्मोस क्षेपणास्त्र; करारावर शिक्कामोर्तब

वृत्तसंस्था । नवीदिल्ली

**भारताला सर्वाधिक शस्त्रांची आयात करणारा देश म्हणून आधी ओळखलं जायचं. मात्र, आता हे चित्र काहीसं बदलल्याचं दिसत आहे. भारताने विकसित शस्त्रांची निर्यात वाढवल्याचं दिसून येत आहे. कारण आता इंडोनेशिया भारताकडून ब्राह्मोस क्षेपणास्त्र खरेदी करणार आहे. भारत आणि इंडोनेशियामध्ये २०० ते ३५० दशलक्ष डॉलर्सच्या दरम्यान ब्राह्मोस क्षेपणास्त्र खरेदी करण्याच्या करारावर शिक्कामोर्तब झालं आहे.**




भारत आणि इंडोनेशियामध्ये ब्राह्मोस क्षेपणास्त्र करारावर शिक्कामोर्तब झालं असून इंडोनेशियाच्या संरक्षण मंत्रालयाने या कराराची माहिती दिल्याचं वृत्त रॉयटर्सने दिलं आहे. दरम्यान, भारत आणि रशियाच्या संयुक्त उपक्रमाच्या माध्यमातून विकसित करण्यात आलेल्या ब्राह्मोस क्षेपणास्त्र खरेदी करण्यासाठी २०२३ मध्ये इंडोनेशियाकडून चर्चा सुरू झाल्या होत्या. दरम्यान, याआधी २०२२ मध्ये फिलिपिन्ससोबतही पहिला ब्राह्मोस क्षेपणास्त्राचा विदेशी करार झाला होता. भारताने याआधी ब्राह्मोस क्षेपणास्त्राचा फिलिपिन्सबरोबरही करार केलेला आहे. फिलिपिन्सबरोबरचा करार म्हणजे भारताची आजवरची पहिली मोठी संरक्षण निर्यात ऑर्डर होती. फिलिपिन्सच्या राष्ट्रीय संरक्षण विभागाने ३७४.९६ दशलक्ष डॉलर्स म्हणजेच २,७०० कोटी रुपयांच्या या कराराला मान्यता दिली होती. भारताने रशियाच्या सहकार्याने ब्राह्मोस क्षेपणास्त्र विकसित केलं आहे. ही क्रूझ क्षेपणास्त्रे सुखोई-३० एमकेआय विमानातून, जमीन आणि युद्धनौकेतूनही डागता येतात. ब्राह्मोस क्षेपणास्त्राच्या पुढील पिढीवर (ब्राह्मोस एनजी) डीआरडीओ काम करत असून ही क्षेपणास्त्रे वजनाने हलकी आणि लहान आहेत. हवाई संरक्षणाची ताकद त्यामुळे आणखी वाढते. हे क्षेपणास्त्रात ७० टक्क्यांपर्यंत देशी बनावटीचे आहे. भारत संरक्षण क्षेत्रामध्ये आत्मनिर्भरतेला महत्त्व देत आहे. या आत्मनिर्भरतेत सर्वांत महत्त्वाचा उल्लेख करावा लागेल.

### क्षेपणास्त्र निर्मितीत डीआरडीओचं योगदान

**क्षेपणास्त्र निर्मितीमध्ये संरक्षण, संशोधन व विकास संस्थेचा (डीआरडीओ) वाटा सर्वाधिक आहे. १९८०च्या दशकात सुरू झालेल्या या निर्मितीची साक्षीदार ही संस्था आहे. आता खासगी क्षेत्र आणि इतर सरकारी कंपन्याही विविध प्रकल्पात सहभागी झाल्या आहेत. संभाव्य धोक्यांचा विचार करून भारतामध्ये क्षेपणास्त्रे तयार केली गेली आहेत.**

# महाराष्ट्र होरपळणार! ‘तीव्र उष्णतेची लाट’

वृत्तसंस्था । मुंबई



**राज्यात सूर्य आग ओकू लागला असून हवामान विभागाने पालघर, ठाणे, मुंबई आणि रायगड या जिल्ह्यांसाठी तीव्र उष्णतेच्या लाटेचा इशारा जारी केला आहे. ९ आणि १० मार्च हे दोन दिवस अत्यंत कठीण राहण्याची शक्यता आहे. एकीकडे उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यात दमट हवामानामुळे नागरिक हैराण होणार असतानाच, सिंधुदूर्ग, कोल्हापूर-सांगली भागात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.**

कोकणातील पालघर, ठाणे, मुंबई आणि रायगड या जिल्ह्यांमध्ये १० मार्च रोजी उष्णतेची लाट ते तीव्र उष्णतेची लाट येण्याची ५१ ते ७५% शक्यता आहे. याचप्रमाणे १० मार्च रोजी या जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट कायम राहील, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

कोकण विभागात तीव्र उष्णतेचा इशारा दिला आहे. पालघर, ठाणे, मुंबई आणि रायगड या जिल्ह्यांत तीव्र उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. रत्नागिरी येथे १० मार्च रोजी हवामान अत्यंत उष्ण आणि दमट असेल. सिंधुदुर्ग येथे (पान २ वर)

**उत्तर महाराष्ट्र –** उष्ण आणि दमट हवामान असून धुळे आणि नंदुरबार येथे उष्ण आणि दमट हवामानाचा इशारा देण्यात आला आहे. जळगावात उष्ण आणि दमट हवामान असेल.

## थोडक्यात

### मुद्रांक शुल्काची निश्चित रक्कम अदा करा, अन्यथा एक लाख दंड

**मुंबई ।** घर वा मालमत्ता खरेदीची नोंदणी करताना यापुढे ग्राहकांना काळजी घ्यावी लागणार आहे. नोंदणीच्या वेळी मालमत्ता वा घरासाठीचे मुद्रांक शुल्काची योग्य आणि निश्चित रक्कम भरावी लागणार आहे. मुद्रांक शुल्काच्या रक्कमेत थोडीशी चूक झाली, अयोग्य रक्कम भरली गेली किंवा कमी-अधिक रक्कम भरली गेली तर लवकरच एक लाख रुपये दंड आकारण्यात येणार आहे.

### लोणावळा, मावळात बसवले हायटेक लेझर स्पीड कॅमेरे

**पुणे ।** वेगमर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांविरुद्ध पुणे ग्रामीण पोलिसांकडून मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावर वडगाव मावळ, लोणावळा येथे अत्याधुनिक लेझर स्पीड कॅमेरे बसविण्यात आले आहे. या कॅमेऱ्यांमुळे भरधाव वाहन चालकांविरुद्ध कारवाई करण्यात येणार आहे. ङ्गमहामार्गावर होणारे बहुंताश अपघात वेग आणि वाहन चालकांच्या चुकांमुळे घडतात. बेशिस्त वाहन चालकांविरुद्ध कारवाई, तसेच अपघात रोखण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून लेझर स्पीड कॅमेऱ्यांचा वापर सुरू करण्यात आला आहे.

### अंबरनाथमध्ये केमिकल कंपनीत आग, स्फोटानंतर धुराचे लोट

**मुंबई ।** अंबरनाथमधील आनंदनगर एमआयडीसीमध्ये आज केमिकल कंपनीत भीषण स्फोट झाल्याची घटना घडली. या स्फोटानंतर आगीचा भडका आणि धुराचे मोठ-मोठे लोट पसरल्याचंही दिसून आलं. स्फोटानंतर कंपनीतील केमिकल रस्त्यावर आल्याने रस्त्यावर देखील आगीचा भडका पाहायला मिळाला, धुराचेही लोटही दूरवर पसरले होते.

# बुडालेल्या दोघांना वाचवताना दोन जणांचा गिरणा नदीत बुडून मृत्यू

प्रतिनिधी । भडगाव

**शहरालगतच्या गिरणा नदीपात्रात मुलांना वाचवण्याचा प्रयत्न करताना दोन जणांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना रविवारी घडली. या घटनेमुळे भडगाव शहरासह परिसरात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.**

मृतांमध्ये नदीम खान नसीम खान (वय २७) आणि काफिया शरीफ पिंजारी (वय १६) यांचा समावेश आहे. याबाबत माहिती अशी की, गिरणा नदीपात्रात काही मुले अडकल्याचे लक्षात येताच नदीम खान आणि काफिया पिंजारी यांनी धाडसाने नदीत उडी घेत मुलांना वाचवण्याचा प्रयत्न केला.

यावेळी जिहान आसिफ शेख (वय ८) आणि शगुफ्ता जब्बार शेख (वय ३५) यांना नदीम खान





यांनी सुरक्षित बाहेर काढले. मात्र, काफिया पिंजारी याला वाचवण्याचा प्रयत्न करत असताना नदीपात्रातील खोल खड्ड्यांमुळे त्यांचा तोल गेला आणि दोघेही पाण्यात बुडाले. स्थानिक नागरिकांनी तातडीने मदत करण्याचा प्रयत्न केला. मात्र तोपर्यंत दोघांचाही मृत्यू झाला होता. दरम्यान, स्थानिक नागरिकांच्या मते नदीपात्रात रात्रीच्या वेळी जेसीबीच्या सहाय्याने सुरू असलेल्या अवैध वाळू उपशामुळे मोठ्या प्रमाणात खोल खड्डे तयार झाले आहेत. याच खड्ड्यांमुळे ही दुर्घटना घडल्याचा आरोप नागरिकांकडून (पान २ वर)

# शेअर बाजारात मोठी घसरण

वृत्तसंस्था । मुंबई

कच्च्या तेलाच्या किंमतींमध्ये झालेली तीव्र वाढ आणि मध्य-पूर्वेतील वाढत्या भू-राजकीय तणावामुळे भारतीय शेअर बाजारात सोमवारी मोठी घसरण झाली. सेन्सेक्स १,३५२.७४ अंक म्हणजेच १.७१ टक्क्यांनी घसरून ७७,५६६.१६ वर बंद झाला. व्यवहाराच्या दरम्यान तो ७६,४२४.५५ पर्यंत खाली आला होता. निफ्टीनेही ४२२.४० अंक म्हणजे १.७३ टक्क्यांची घसरण नोंदवत २४,०२८.०५ वर बंद झाला. दिवसभरात निफ्टी २३,६९७.८० च्या नीचांकी पातळीपर्यंत घसरला होता. जागतिक बाजारात आलेले कमकुवत संकेत आणि रुपया नव्या नीचांकी पातळीवर पोहोचल्यामुळे गुंतवणूकदारांचा विश्वास डळमळीत झाला.

# ५० लाखांच्या विमा दाव्यासाठी बनावट अपघात?

## चाळीसगावात घोटाळा उघड; डॉक्टरांसह ४ पोलिसांवर गुन्हा दाखल

प्रतिनिधी । चाळीसगाव

**तालुक्यातील दहिवद फाट्यावर झालेल्या कथित अपघाती मृत्यू प्रकरणात धक्कादायक फसवणूक उघडकीस आली आहे. ५० लाख रुपयांच्या पर्सनल एक्सीडेंट विमा दाव्यासाठी अपघाताचा बनाव रचल्याचा आरोप असून या प्रकरणात मृताच्या कुटुंबीयांसह चाळीसगाव ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी मंदार करंबळेकर आणि मेहुनबारे पोलीस ठाण्यातील चार पोलीस कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

याबाबत माहिती अशी की, दि.३ मे २०२५ रोजी मालेगाव येथील दुचाकीस्वार राजेंद्र शालिंदर जाधव यांचा दहिवद फाट्यावर चारचाकी वाहनाच्या धडकेत अपघात झाल्याचा दावा करण्यात आला




होता. या अपघातात जखमी झालेल्या जाधव यांचा चाळीसगाव ग्रामीण रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची माहिती कुटुंबीयांनी विमा कंपनीला दिली होती. या घटनेच्या आधारे श्रीराम जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेडकडे ५० लाख रुपयांच्या विम्याचा दावा अरुणा राजेंद्र जाधव यांनी सादर केला. दाव्यानुसार दि. १९ एप्रिल २०२५ रोजी रात्री सुमारे ९.३० वाजता राजेंद्र जाधव हे त्यांच्या मोटरसायकल (क्र. एमएच ४१ बीक्यू २८१७) वरून मालेगावकडे जात (पान २ वर)

# राज्यभरात ८१ शिक्षक-कर्मचाऱ्यांचे निलंबन

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्यात दहावी आणि बारावीच्या बोर्ड परीक्षांदरम्यान मास कॉपीच्या प्रकारांवर मोठी कारवाई करण्यात आली असून आतापर्यंत ८१ शिक्षक व कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. ही माहिती राज्य मंडळाने परिपत्रकाद्वारे दिली आहे.**

यंदा परीक्षा केंद्रांवर लावलेल्या सीसीटीव्ही यंत्रणेमुळे मास कॉपीचे प्रकार पुराव्यासह समोर आले. त्यानंतर संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येत आहे. कन्नड तालुक्यातील जैतापूर येथील राष्ट्रीय उच्च माध्यमिक विद्यालयाच्या केंद्र



क्रमांक ००७९ वरही सामूहिक कॉपीचा प्रकार उघडकीस आला. सीसीटीव्ही फुटेजमध्ये पर्यवेक्षक आणि केंद्र संचालक प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत करत असल्याचे दिसून आल्याने २४ जणांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला असून त्यापैकी २१ जणांना निलंबित करण्यात आले आहे.

दरम्यान जालना जिल्ह्यातील मंठा तालुक्यातील दोन केंद्रांवर इंग्रजी विषयाच्या पेपरदरम्यान विद्यार्थ्यांकडून कॉपी करताना आढळले. या प्रकरणात पर्यवेक्षक म्हणून नियुक्त असलेल्या ५ शिक्षकांवर कारवाई करण्यात आली आहे. (पान २ वर)

**बीड जिल्ह्यातील चौसाळा येथील कला-विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या केंद्र क्रमांक २२४ वर बारावीच्या परीक्षेदरम्यान कॉपी झाल्याचे उघड झाले. या प्रकरणात प्रशासनाने १७ कर्मचाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांना निलंबित केले. हा प्रकार १० फेब्रुवारी रोजी पहिल्याच पेपरच्या दिवशी घडल्याची माहिती आहे.**

# ओला, उबर, रॅपिडोचा बाईक टॅक्सी परवाना रद्द




वृत्तसंस्था । मुंबई

मुंबईसह परिसरात बेकायदेशीररित्या सुरु असलेल्या ई-बाईक टॅक्सी सेवेला लगाम घालण्यासाठी राज्य सरकारने आता कठोर पावले उचलली आहेत. ओला, उबेर, रॅपिडो या कंपन्यांचे तात्पुरते बाईक टॅक्सी परवाने आजपासून रद्द करण्यात आल्याची घोषणा परिवहनमंत्र्यांनी विधानपरिषदेत केली.

मुंबईसह आसपासच्या परिसरात सुरु असलेल्या बेकायदा पेट्रोल बाईक टॅक्सीवर अंकुश ठेवण्याबाबत विधानपरिषदेत शिवसेना आमदार सुनील शिंदे यांनी सूचना उपस्थित केली होती. बाईक टॅक्सीचालक परराज्यातील असल्यामुळे स्थानिक भूमिपुत्रांवर अन्याय होत असून स्थानिक भूमिपुत्रांना या सेवेत प्राधान्य देणार का, बाईक टॅक्सी सेवेसाठी या कंपन्यांना तात्पुरते परवाने दिले होते परंतू चार महिने उलटले तरी त्यांनी काही बाबींची पूर्तता केलेली नाही त्यामुळे अशा कंपन्यांवर कारवाई करणार का असा सवाल सुनील शिंदे यांनी

### परिवहनमंत्र्यांची विधानपरिषदेत घोषणा

उपस्थित केला होता.

त्यावर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, राज्यातील बेरोजगार तरुण-तरूणींना रोजगार मिळावा यासाठी ई-बाईक टॅक्सी सुरू करण्याचा निर्णय घेतला होता. ओला, उबर, रॅपिडो या कंपन्यांना मुंबई महानगर क्षेत्रात एका महिन्यासाठी तात्पुरता परवाना दिला होता. या कालावधीत कंपन्यांनी सर्व आवश्यक अटींची पूर्तता करून अंतिम परवाना घेणे अपेक्षित होते. परंतू, या कंपन्यांनी नियमांची पूर्तता न करता बेकायदेशीरित्या वाहतूक सुरू ठेवल्याचे परिवहन मंत्र्यांनी मान्य केले. काही ठिकाणी बाईक टॅक्सी चालकांकडून अपघात व महिलांच्या सुरक्षिततेसंदर्भात तक्रारी समोर आल्या आहेत. त्यामुळे संबंधित कंपन्यांना परिवहन विभागाने नोटिसा बजावल्या असून काही प्रकरणांमध्ये (पान २ वर)

# महिला दिन हा केवळ उत्सवाचा दिवस नसून महिलांच्या कर्तृत्वाचा, संघर्षाचा सन्मान

## जळगाव जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष श्याम शिंदे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । जळगाव

**घरापासून ते देशाच्या प्रगतीपर्यंत प्रत्येक क्षेत्रात महिलांनी आपली क्षमता सिद्ध केली आहे. जागतिक महिला दिन हा केवळ उत्सवाचा दिवस नसून महिलांच्या कर्तृत्वाचा, संघर्षाचा आणि समाजातील त्यांच्या अमूल्य योगदानाचा सन्मान करण्याचा दिवस आहे, असे प्रतिपादन जळगाव जिल्हा समस्त न्यायालयीन कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष श्याम शिंदे यांनी केले.**

जळगाव जिल्हा समस्त न्यायालयीन कर्मचारी संघटनेच्या वतीने जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने जळगाव जिल्हा न्यायालयातील महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात



आला. संघटनेच्या व सर्व न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या वतीने महिलांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत व अभिनंदन करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंजू व्यास होत्या. तसेच प्रमुख अतिथी म्हणून संघटनेचे अध्यक्ष श्याम शिंदे, श्रीमती शुक्ला, श्रीमती पुराणिक, श्रीमती अश्विनी भट, श्रीमती गंगा वासेवाय व शोभा गायकवाड उपस्थित होत्या. संघटनेचे अध्यक्ष श्याम शिंदे पुढे म्हणाले की, आजची स्त्री आत्मविश्वासाने व धैर्याने प्रत्येक आव्हानाला सामोरी जात असून कुटुंबाबरोबरच समाज आणि देशाच्या विकासातही मोठे योगदान देत आहे. त्यामुळे कर्तृत्ववान महिलांचा गौरव करण्याची खरी गरज आहे, असे सांगून त्यांनी सर्व महिला कर्मचाऱ्यांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी महिलांचे समाजातील तसेच न्यायालयीन कामकाजातील महत्त्वपूर्ण योगदान अधोरेखित करण्यात आले. महिला दिनानिमित्त महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव करून त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. या कार्यक्रमास जळगाव जिल्हा लघुलेखक संघटनेचे अध्यक्ष योगेश सोनवणे, प्रकाश सपकाळ, बेलीफ संघटनेचे अध्यक्ष सुजित चंदनकर, चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटनेच्या प्रतिनिधी शितल माळी, जिल्हा संघटनेचे उपाध्यक्ष प्रकाश सोनार, सरचिटणीस रवी अहिरराव, कोषाध्यक्ष दिनेश वाघ, सह-कोषाध्यक्ष अतुल भालेराव, सहसचिव हर्षल शिरसागर तसेच संघटनेचे पदाधिकारी व न्यायालयीन महिला कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन परवीन पटेल यांनी केले. आभार गंगा वासेवाय यांनी मानले.

## संपादकीय

### आता अग्निपरीक्षा!

डोनाल्ड ट्रम्प यांची भारताबाबतची आक्षेपार्ह विधाने आणि इराण-इस्रायल युद्धाबाबत केंद्र सरकारने मौन बाळगले असतानाच सोमवारपासून संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन (दुसरा भाग) सुरू होत आहे. अर्थसंकल्पीय दुसऱ्या टप्प्याचे अधिवेशन ९ मार्च ते २ एप्रिलपर्यंत चालेल. गेल्या काही दिवसांत राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर घडलेल्या घटनांवर नजर टाकली तरी अधिवेशनाच्या काळात संसदेत जोरदार हंगामा होण्याची पूर्ण शक्यता आहे. इंडिया आघाडीच्या हातात केंद्र सरकारला घेरण्यासाठी अनेक मुद्दे आहेत. यातही विरोधकांच्या तोफेचे तोंड पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दिशेने असल्याचे बघायला मिळणार आहे. विरोधकांकडे सरकारच्या विरोधात आधीच भरपूर मुद्दे असतानाच अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताबाबत आक्षेपार्ह उलटसुलट विधाने केली आहेत. यामुळे सरकारला घेरण्यासाठी विरोधकांच्या हाती आयते कोलीत लागले आहे. पुढील महिन्यात पश्चिम बंगालसह तमिळनाडू, केरळ, आसाम आणि पुद्दुचेरी या पाच राज्यांमध्ये विधानसभेची निवडणूक होणार आहे. निवडणुकीची घोषणा आता कोणत्याही क्षणी केली जाऊ शकते. अशातच, एसआयआरचे काम पूर्ण न झाल्यामुळे बंगालमधील निवडणुका पुढे ढकलल्या जाऊ शकतात आणि तेथे राष्ट्रपती राजवट लागू केली जाऊ शकते, अशी चर्चा रंगली आहे. या मुद्द्यावरून गोंधळाचे मोहोळ उठण्याची शक्यता आहे. सरकारची डोकेदुखी वाढविणारा मुद्दा म्हणजे, मद्य घोटाळाप्रकरणी न्यायालयाने दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यासह सर्व आरोपींची केलेली निर्दोष सुटका. हा मुद्दा गाजल्याशिवाय राहणार नाही. आपचे खासदार संजय सिंग सरकारविरूद्ध आग ओकतात. आता त्यांच्या हाती मोठा मुद्दा लागला आहे. ते या मुद्याचा उपयोग सरकारला घेरण्यासाठी करतील. सरकार त्यांचा हा डाव कशाप्रकारे उधळून लावते हे पाहणे मजेशीर ठरणार. अमेरिका आणि इस्रायलने इराणवर हल्ला केला. यात इराणी नेते खामेनी मारले गेले. भारताने इराण-इस्रायल युद्ध आणि खामेनी यांच्या निधनावर कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी वर्तमानपत्रात लेख लिहून सरकारवर नाराजी व्यक्त केली. मात्र, डोनाल्ड ट्रम्प यांच्या सरकारच्या मंत्र्यांनी भारताला रशियाकडून तेल खरेदी करण्यासाठी ३० दिवसांची मुदत देण्यात आली असल्याचा दावा केला आहे. या मुद्द्याने तेलाच्या उकळत्या कढईत पाणी शिंपडण्याचं काम केलं आहे. मंत्रालयाने यावर प्रतिक्रिया दिली आहे. परंतु, विरोधक त्याने समाधानी होतील असा समज करून घेणे भाबडेपणा ठरेल. सरकारने खामेनी यांच्या निधनावर शोक व्यक्त केला असला तरी काँग्रेससह विरोधी पक्षाकडून सरकारला घेरण्याचा पूर्ण प्रयत्न केला जाईल यात तिळमात्र शंका नाही. इस्रायल, अमेरिका आणि इराणमधील लष्करी संघर्षामुळे जगापुढे इंधनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. पश्चिम आशियातील संकटाबाबत सरकारच्या दृष्टिकोनावर टीका करणाऱ्या सोनिया गांधी यांच्या लेखातूनही ही बाब स्पष्ट होते. अधिवेशनाच्या या भागात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा सभागृह गाजवून सोडणार आहे. तो म्हणजे, लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या विरोधातील अविश्वास प्रस्ताव. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यापूर्वी, काँग्रेससह अनेक पक्षांनी इराणवरील इस्रायली-अमेरिकेच्या हल्ल्यावर आणि इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या मृत्यूवर निवेदन देण्याची मागणी केली आहे. थोडक्यात काय तर, संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा गोंधळाने गाजण्याची शक्यता आहे.

# एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये आजपासून 'कॉम्प्लेक्स अँजिओप्लास्टी' शिबीर

## लंडनचे प्रख्यात आंतरराष्ट्रीय हृदयविकार तज्ज्ञ डॉ. सुधीर राठोरे करणार मार्गदर्शन

प्रतिनिधी । नाशिक

**सर्वसामान्य रुग्णांना दर्जेदार आणि जागतिक दर्जाची आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने एसएमबीटी हॉस्पिटल व एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूटतर्फे विशेष पुढाकार घेत येत्या १० ते १५ मार्चदरम्यान मोफत हृदयरोग तपासणी व जटिल (कॉम्प्लेक्स) अँजिओप्लास्टी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात लंडन येथे कार्यरत असलेले आंतराष्ट्रीय ख्यातीचे प्रसिद्ध इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट डॉ. सुधीर राठोरे यांच्या मार्गदर्शनाखाली जटील अँजिओप्लास्टीसाठी मार्गदर्शन करणार असल्याची माहिती एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूटचे संचालक व वरिष्ठ हृदयविकार तज्ज्ञ डॉ. गौरव वर्मा यांनी दिली.**

ते म्हणाले की, हे शिबिर १० मार्च ते १५ मार्चपर्यंत आयोजित करण्यात आले आहे. दररोज सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत शिबिरात रुग्णांसाठी सुरु राहणार आहे. डॉ. राठोरे हे १३ व १४ मार्च रोजी एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये उपस्थित राहून रुग्णांची जटिल अँजिओप्लास्टी करण्यासाठी मार्गदर्शन करतील. डॉ. राठोरे हे लंडन येथील एनएचएस हॉस्पिटल येथे कन्सलटंट इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा लाभ उत्तर महाराष्ट्रातील रुग्णांना मिळणार असल्यामुळे जास्तीत जास्त रुग्णांनी या संधीचा लाभ घ्यावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.





या सात दिवसीय शिबिरामध्ये हृदयाच्या रक्तवाहिन्यांवरील अॅडव्हान्स कोरोनरी इंटरव्हेंशन उपलब्ध करून दिले जाणार आहेत. यामध्ये क्रॉनिक टोटल ऑक्लूजन अँजिओप्लास्टी, गुंतागुंतीची व जटिल अँजिओप्लास्टी, लेफ्ट मेन व बायफर्केशन अँजिओप्लास्टी, रोटेशनल अॅथरेक्टॉमी, आयव्हस व रोटा यांसारख्या अत्याधुनिक इमेजिंग तंत्रज्ञानाचा वापर करून उपचार केले जाणार आहेत. तसेच हृदयविकाराचा धक्का बसलेल्या रुग्णांसाठी तातडीची अँजिओप्लास्टी करण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

यासोबतच छातीत दुखणे, जळजळ होणे, चालताना दम लागणे किंवा अचानक दरदरून घाम येणे यांसारखी लक्षणे आढळल्यास ती हृदयविकाराची असू शकतात. अशा लक्षणांकडे दुर्लक्ष न करता नागरिकांनी या शिबिरात मोफत आपली तपासणी करून घ्यावी, असे आवाहन रुग्णालयाचे चीफ ऑपरेटिंग ऑफिसर सचिन बोरसे यांनी केले. विशेष म्हणजे, आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेअंतर्गत पात्र असणाऱ्या रुग्णांना या शिबिरात मोफत उपचार व शस्त्रक्रियेची सुविधा दिली जाणार असल्याचे बोरसे यांनी सांगितले. यासोबतच या शिबिराच्या अधिक माहितीसाठी हृदयविकार विभागाच्या ७७४४९१३९१३ या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये अद्ययावत असलेली साधन सामुग्री आणि सुसज्ज क्रिटीकल केअर विभाग यामुळे मुंबई पुण्यासारख्या ठिकाणी होत असलेल्या क्लिष्ट शस्त्रक्रिया, प्रक्रिया एसएमबीटीत करणे शक्य झाले आहे. अशा प्रकारच्या कॉम्प्लेक्स अँजिओप्लास्टी करण्यासाठी वेगळ्या प्रकारचे कौशल्य अवगत असणे गरजेचे असते.

हे कौशल्य येथील तज्ज्ञांकडे असल्यामुळे गेल्या काही वर्षांत याठिकाणी फादर ऑफ कार्डीओलॉजीस्ट डॉ सम्युअल मॅथ्युज, दिवंगत सीव्हीटीएस सर्जन डॉ. एस.एस. भट्टाचार्य, बाल हृदयविकार तज्ज्ञ डॉ. गुयेन लॅन ह्यू, प्रसिद्ध तावी कॉम्प्लेक्स अँजिओप्लास्टी तज्ज्ञ डॉ. यान कोवाक यांनीही याठिकाणी उपस्थित राहून हृदयविकार प्रक्रिया केल्या आहेत.

### ➤ हे शिबीर कोणासाठी उपयुक्त?

ज्या रुग्णांना हृदयाच्या रक्तवाहिन्यांतील ब्लॉकेजमुळे बायपास शस्त्रक्रियेचा सल्ला देण्यात आला आहे, परंतु बायपास करणे धोकादायक ठरू शकते किंवा ज्यांना बायपासची भीती वाटते, अशा रुग्णांसाठी हे शिबिर विशेष उपयुक्त आहे. कॅल्शियम साचल्यामुळे कडक झालेल्या रक्तवाहिन्या, रोटा, आयव्हस यांसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अँजिओप्लास्टी करण्याचा सल्ला दिलेले रुग्ण तसेच ज्या रुग्णांच्या धमनीतील ब्लॉकेज कठीण किंवा गुंतागुंतीच्या ठिकाणी आहे आणि ज्यासाठी तज्ज्ञ हृदयविकार तज्ज्ञांची आवश्यकता असते, अशा रुग्णांनी या शिबिराचा लाभ घ्यावा.

### लंडनच्या तज्ज्ञ एसएमबीटीत

हृदयविकाराच्या उपचारांमध्ये तंत्रज्ञान वेगाने बदलत आहे. अनेकदा रक्तवाहिन्यांमध्ये मोठ्या प्रमाणात कॅल्शियम साचलेले असते किंवा त्या पूर्णपणे बंद झालेल्या असतात. अशा जटिल केसेसमध्ये सामान्य अँजिओप्लास्टी यशस्वी होत नाही, तिथे अद्ययावत तंत्रज्ञानाची गरज असते. एसएमबीटीमध्ये आम्ही जागतिक दर्जाची ही सेवा ग्रामीण आणि गरजू रुग्णांपर्यंत पोहोचवत आहोत. डॉ. सुधीर राठोरे यांच्यासारख्या आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांच्या अनुभवामुळे आणि कौशल्यामुळे आपल्या भागातील रुग्णांना लंडनसारख्या शहरात मिळणारे उपचार मार्गदर्शन एसएमबीटीत उपलब्ध होणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा.

**- डॉ. गौरव वर्मा**
संचालक व वरिष्ठ हृदयविकार तज्ज्ञ
एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूट

## रांका विद्यालयात महिला शिक्षिकांचा सन्मान

प्रतिनिधी । बोदवड

येथील रांका विद्यालयात क्रीडा विभागाच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत महिला शिक्षिकांचा सन्मान व कलाविष्कार स्पर्धेतील पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात पार पडला. हा कार्यक्रम मंजुलता प्रकाशचंद सुराणा यांच्या अध्यक्षतेखाली झाला. यावेळी वैशाली जैन, सुजाताई कोटेचा, शिल्पा जैन, कांता जैन, अर्चना जैस्वाल, शोभा माटे, कांतादेवी जैन, प्राजक्ता पाटील, अनिता चौधरी यांच्यासह मुख्याध्यापक पी.एम. पाटील, उपमुख्याध्यापिका एम. एस. बडगुजर, उपप्राचार्या एम.टी. नेमाडे, आर.के.तायडे, जे.एन. उपस्थित होते.

# नाशिक पालीवाल समाजातर्फे डॉ.पालीवाल यांचा सत्कार



प्रतिनिधी । नाशिक

**महाराष्ट्र पालीवाल परिषदेचे महामंत्री व ज्येष्ठ पत्रकार अनिलकुमार द्वा. पालीवाल यांना पंडित दीनदयाल उपाध्याय हिंदी विद्यापीठातर्फे नुकत्याच प्राप्त झालेल्या पीएचडी, मानद डॉक्टरेट सरस्वती सन्मानाबद्दल येथील पालीवाल समाज व पालीवाल महिला मंडळातर्फे सत्कार करण्यात आला.**

पालीवाल समाज अध्यक्ष कांतिलाल पालीवाल, महिला मंडळ अध्यक्ष मनिषा पालीवाल यांनी डॉ.अनिलकुमार पालीवाल यांना शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन तसेच रंगोत्सव निमित्ताने रंग लावून सत्कार केला.



याप्रसंगी समाजाचे उपाध्यक्ष सुधीर पालीवाल, सचिव तुषार पालीवाल, सहसचिव दीपक पालीवाल, कोषाध्यक्ष गणेश पालीवाल, शांतीलाल पालीवाल, अरुण पालीवाल, मधुकर पालीवाल, आशिष पालीवाल, अतुल पालीवाल, मनिषा पालीवाल, आक्काताई पालीवाल, नमिता पालीवाल, ज्योती पालीवाल, रश्मी पालीवाल, किरण पालीवाल, गायत्री पालीवाल, भारती पालीवाल, प्रियांका पालीवाल आदी सदस्य याप्रसंगी उपस्थित होते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीतर्फे बैठकीचे आयोजन

प्रतिनिधी । जळगाव

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आगामी जयंतीनिमित्ताने साजऱ्या करण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने जळगाव शहर उत्सव समितीच्या वतीने दि. ८ मार्च रोजी संध्याकाळी पाच वाजता पद्मालय विश्रामगृह येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.**

यात जयंती उत्सवात विविधता, प्रबोधनपर कार्यक्रम, भीम महोत्सव, वैचारिक उत्सवाचे स्वरूप कसे देता येईल, संविधानाने देश किती सुरक्षित आहे, सर्वधर्मसमभाव कसा संविधानाने जोपासला आहे. अशा विविध अशा विषयानुरूप जयंती उत्सवाचे स्वरूपावर चर्चा करण्यात येवून नियोजन करण्यात येणार आहे. या बैठकीस उपस्थितीचे आवाहन उत्सव समितीचे अध्यक्ष मुकुंद सपकाळे यांनी केले आहे.

## पान १ वरुन

### महाराष्ट्र होरपळणार!......

हलक्या पावसाची शक्यता असून त्यानंतर हवामान कोरडे राहील. नाशिक येथे उष्ण आणि दमट हवामानाची शक्यता आहे. अकोला येथे १० आणि ११ मार्च रोजी उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. अमरावती येथे उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. वर्धा येथे १० आणि ११ मार्च रोजी उष्णतेची लाट येण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया आणि नागपूर या जिल्ह्यांसाठी सध्या कोणताही इशारा देण्यात आलेला नाही.

### ५० लाखांच्या विमा......

असताना काळ्या रंगाची महिंद्रा थार (क्र. एमएच १९ डीव्ही ०५०५) या वाहनाने धडक दिली होती. या प्रकरणात मेहुनबारे पोलिस ठाण्यात एफआयआर क्र. ८६/२०२५ नोंदविण्यात आला होता. मात्र विमा कंपनीने अधिक तपासासाठी ब्ल्यू स्पाय या तपास संस्थेकडे चौकशी सोपवली. चौकशीदरम्यान अनेक गंभीर विसंगती समोर आल्या. तपास अधिकाऱ्यांना असे आढळून आले की, राजेंद्र शालिंदर जाधव यांचा प्रत्यक्ष मृत्यू दि. २३ फेब्रुवारी २०२४ रोजी यकृताच्या गंभीर आजारामुळे झाला होता. ते दीर्घकाळ मद्यपान करत असल्याने त्यांच्या आरोग्याशी संबंधित गुंतागुंत निर्माण झाली होती. तपास अधिकाऱ्यांनी मृताच्या घरी भेट दिली असता भिंतीवर लावलेल्या फोटोवर मृत्यू दिनांक २३ फेब्रुवारी २०२४ असा उल्लेख आढळून आला. म्हणजेच कथित अपघाताच्या तारखेच्या बऱ्याच आधी त्यांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. तसेच ग्रामपंचायतीच्या नोंदी तपासल्यावर मृत्यूची अधिकृत नोंदच नसल्याचे माहिती अधिकारातून दि. १२फेब्रुवारी२०२६ रोजी स्पष्ट झाले. तपासात आणखी धक्कादायक बाब समोर आली. मृतकाच्या आधार कार्ड व इतर कागदपत्रांमध्ये वेगवेगळे पत्ते नमूद असल्याचे आढळले. शिवाय श्रीराम इन्शुरन्स व्यतिरिक्त सुमारे १० विमा कंपन्यांकडून विमा पॉलिसी घेतल्याचेही उघड झाले. यावरून अपघात व मृत्यूची कथा पूर्णपणे बनावट असल्याचा संशय बळावला. मेहुनबारे पोलिस ठाण्यात पो. महेंद्र पाटील, रवींद्र एकनाथ बत्तीशे, सचिन अशोक निकम, सुनील अशोक निकम यांनी खोटी नोंद केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सर्व आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांना न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. या प्रकरणाचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी पाचोरा बापू रोहम करत आहेत.

### बुडालेल्या दोघांना वाचवताना......

करण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस व महसूल प्रशासनाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. महसूल विभागाचे अविनाश जंजाडे व प्रशांत कुंभारे, पोलिस निरीक्षक महेश शर्मा, राजू अहिरे तसेच इकबाल शेख यांनी घटनास्थळी पाहणी केली. तसेच नगरसेवक मिर्झा आसिम, अलीम शाह व डॉ. विजयकुमार देशमुख यांनी घटनास्थळी उपस्थित राहून मृतांच्या कुटुंबीयांना धीर दिला. नगरपरिषद मुख्याधिकारी मंगेश देवरे यांनी पाचोरा येथून नदीत शोधमोहीम राबवण्यासाठी कर्मचारी पाठवले. आरोग्य विभागाचे छोटे वैद्य, अजय कंडारे तसेच पाचोरा येथील गोताखोर हुसेन दादा यांनी शोध व मदतकार्यात सहभाग घेतला. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच आमदार किशोर आप्पा पाटील यांनी भडगाव ग्रामीण रुग्णालयात भेट देऊन मृतांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले.

### राज्यभरात ८१ शिक्षक......

याशिवाय गडचिरोली जिल्ह्यातील एका परीक्षा केंद्रावर राज्यशास्त्र विषयाच्या पेपरमध्ये मायक्रोनोट्स आणि प्रिंटआउटच्या मदतीने सामूहिक कॉपी केल्याचे आढळले. या प्रकरणात तीन शिक्षक आणि एका शिपायावर गुन्हा दाखल करून सर्वांना निलंबित करण्यात आले आहे. या कारवाईमुळे शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

### ओला, उबर, रॅपिडोचा......

पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. एप्रिल २०२४ पासून आतापर्यंत १३० दुचाकी वाहनांवर कारवाई करून सुमारे ३३ लाख रुपयांहून अधिक दंड वसूल करण्यात आल्याची माहिती परिवहन मंत्र्यांनी दिली. ओला, उबेर, रॅपिडो या कंपन्यांची मुजोरी वाढली आहे. बाईक टॅक्सीचालक आम्हाला सुद्धा जुमानत नाही अशा अनेक तक्रारी आरटीओ अधिका-यांनी आमच्याकडे केल्या आहेत. त्यामुळे बाईक टॅक्सी चालकावर गुन्हे न नोंदवता थेट मालकांवर गुन्हे नोंदवण्याच्या सूचना परिवहन विभागाकडून देण्यात आल्या आहेत, असेही मंत्र्यांनी सांगितले.

## जळगावच्या पोलिसाने घेतला गळफास

प्रतिनिधी । जळगाव

शहरातील एमआयडीसी पोलीस ठाण्यात डीबी रायटर म्हणून कार्यरत एका पोलीस कर्मचाऱ्याने चाळीसगाव तालुक्यातील पोटगाव येथे राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. जळगाव शहरातील एमआयडीसी पोलीस ठाण्यात निलेश पाटील हे डीबी रायटर म्हणून कार्यरत होते. चाळीसगाव तालुक्यातील पोटगाव येथील रहिवासी असलेले निलेश पाटील शनिवारी गावी एक कार्यक्रमासाठी गेले होते. राहत्या घरात त्यांनी गळफास घेत जीवन संपवले. सोमवारी हा प्रकार कुटुंबियांच्या निदर्शनास आला. घटनास्थळी चाळीसगाव शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक अमीत मनेल यांनी भेट दिली.

# भटके विमुक्त जातींना शासनाने बिनव्याजी कर्ज द्यावे

## ● वरणगाव येथे भटके विमुक्त समाज बांधवांच्या बैठकीत मागणी

प्रतिनिधी । वरणगाव

येथे नुकतेच भटके विमुक्त समाज बांधवांची बैठक झाली. या बैठकीला राज्याचे भटके विमुक्त समाजाचे नेते रवींद्र गायकवाड, अरुण धनगर यांच्या प्रमुख उपस्थित संपन्न झाली. यावेळी भटके विमुक्त समाजातील सुशिक्षित बेरोजगार, महिला बचतगट, विविध शासकीय योजना समाज बांधवापर्यंत पोहोचविण्यात यावे, भटके विमुक्त समाजाला बिनव्याजी कर्ज शासनामार्फत व्यवसायासाठी उपलब्ध करून द्यावे, धनगर समाजाला अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट करण्याबाबत शासन दरबारी प्रयत्न करणे आदी प्रमुख मागण्याबाबत मार्गदर्शन व चर्चा करण्यात आली.



याप्रसंगी ज्येष्ठ समाजसेवक रवींद्र गायकवाड, अरुण धनगर, भगवान वंजारी, रफिकभाई पठाण, राजाराम वंजारी, हरचंद भोई, परशुराम गुंमळकर, घनश्याम भुते, सतीश पर्वते, वाल्मीक जाधव व महिला आघाडीच्या भारती कापसे, संध्या पवार तसेच कृष्णा शिंदे, तुषार बाबर, पांडुरंग कलनोर, राजेश बाबर, आनंद शिंदे, पंकज गुंमळकर , राजेश करनोर, अनिल शिंदे, दीपक कन्नोर, आनंद माळवे, नवल शिंदे, आदी प्रमुख भटके विमुक्त बहुजन संघाचे पदाधिकारी व समाज बांधव बहुसंख्येने उपस्थित होते.

# चोपड्यात महिला पोलिस पाटलांचा सन्मान

प्रतिनिधी । चोपडा

**जागतिक महिला दिनानिमित्त चोपडा येथे महिला पोलिस पाटील यांना सन्मानित करण्यात आले.**

हा दिवस केवळ शुभेच्छांचा नसून, महिलांवरील अत्याचार कमी करणे आणि त्यांना समान संधी देणे याबद्दल जागृती करण्याचा आहे. डिजिटल युगात महिलांनी घर आणि करिअरचा समतोल साधत, सुपरमॉमची नवी ओळख निर्माण केली आहे. सर्व पोलिस पाटील यांच्या वतीने पोलिस पाटील संघाचे अध्यक्ष नंदलाल बाविस्कर वडगावसिम यांनी सत्कार केला.




यावेळी सत्कारार्थी महिला पोलीस पाटील माजी उपाध्यक्ष वंदना मोरे संपले, सुनिता पाटील धुपे बु., चारुलता देवराज गलंगी, पुष्पा कचरे मजरे हिंगोणे, अर्चना पाटील तावसे बु., मनीषा पारधी मराठे, रत्नाबाई पाटील गणपूर, अर्चना पाटील खचणे आदी उपस्थित होते. तसेच जिल्हा उपाध्यक्ष जितेंद्र पाटील हातेड बु., माजी अध्यक्ष दत्तात्रय पाटील खडगाव, ज्येष्ठ पोलिस पाटील हिरामण पाटील घुमावल, अध्यक्ष नंदलाल बाविस्कर वडगाव सिम, कार्याध्यक्ष नितीन पाटील दोंदवाडे, सचिव भागवत पाटील घाडवेल, सदस्य संजय कोळी विष्णापूर, सचिन पाटील गलवाडे, जितेंद्र पाटील लासूर, आनंद शिरसाठ विचखेडा, रत्नाकर पाटील कठोरा, दीपक पाटील कुरवेल, अमर पावरा मालापूर, पवन भील निमगव्हाण, प्रल्हादसिंग भुगवाडे उमर्टी, कालरसिंग बारेला खऱ्यापाडाव, योगेश सोनवणे सत्रासेन व चोपडा ग्रामीणचे पोलिस पाटील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.- ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
**✻ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी** (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# मनपाच्या स्वच्छता अभियानात २० टन कचरा संकलित

## महापौर दीपमाला काळे यांच्या निर्देशांनुसार साफसफाई; शहरातील मार्केट झाले चकाचक



प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव शहर महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात आलेल्या विशेष स्वच्छता अभियानांतर्गत शहरातील महानगरपालिकेच्या मार्केटची यशस्वीरीत्या साफसफाई करण्यात आली. मनपाच्या स्वच्छता अभियानात २० टन कचरा संकलित करण्यात आला.**



महापौर दीपमाला काळे यांनी दिलेल्या आदेशानुसार हे अभियान राबवून शहराचा चेहरामोहरा बदलण्याचा प्रयत्न मनपा प्रशासनाकडून करण्यात आला आहे. यापुढे देखील ही मोहीम चालतच राहणार आहे. अभियानाचे स्वरूप आणि सहभाग या मोहिमेमध्ये महानगरपालिकेची सर्व यंत्रणा, ट्रॅक्टर, डंपर आणि मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ उतरवण्यात आले होते. विशेष म्हणजे, बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे या कंपनीचे कर्मचारी आणि मनपा आस्थापना सूचीवरील कायम कामगार यांनी एकत्रितरित्या नियोजन करून ही मोहीम फत्ते केली.

सहाय्यक आयुक्त (आरोग्य) उदय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग समिती क्रमांक १ ते ४ च्या मुख्य स्वच्छता निरीक्षकांनी हे अभियान यशस्वीरीत्या राबवले. २० टन कचऱ्याचे संकलन दोन दिवस चाललेल्या या धडक मोहिमेत गेंदालाल मिल मनपा मार्केट, फुले मार्केट यांसह शहरातील विविध व्यापारी संकुलांची साफसफाई करण्यात आली. या संपूर्ण प्रक्रियेत सुमारे २० टन कचरा संकलित करण्यात आला असून, त्याची तात्काळ कचरा प्रकल्पावर शास्त्रोक्त पद्धतीने वाहतूक करण्यात आली आहे. पुढील आठवड्यात गोलाणी मार्केटचीदेखील स्वच्छता करण्याचे नियोजन झाले आहे. महापौर दीपमाला काळे यांनी १८ फेब्रुवारी रोजी दिलेल्या आदेशानुसार या मोहिमेचे नियोजन करण्यात आले होते. महात्मा फुले मार्केट, सेंट्रल फुले मार्केट, शास्त्री टॉवर, नवीन व जुने बी.जे. मार्केट, छत्रपती शाहू महाराज मार्केट, गेंदालाल मिल मार्केट, भास्कर मार्केट, डॉ. आंबेडकर मार्केट, वालेचा मार्केट, ठाकरे मार्केट, गांधी मार्केट, श्यामाप्रसाद मुखर्जी उद्यान मार्केट व परिसर, छत्रपती शिवाजीनगर येथील दवाखाना, शिवाजीनगर येथील शाळा क्रमांक १, नानीबाई अग्रवाल रुग्णालय परिसर आणि अन्य प्रमुख मार्केटमध्ये ही स्वच्छता करण्यात आली.



## थोडक्यात

### पारोळा येथे महिला दिन साजरा

**पारोळा ।** येथील सौ.एम.यु. करोडपती इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये जागतिक महिला दिवस विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष यू.एच. करोडपती होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव डॉ. सचिन करोडपती, संचालक डॉ. चेतन करोडपती, संचालिका मंगला करोडपती, सदस्या राधिका करोडपती, प्राचार्या स्वाती बलखंडे उपस्थित होते. यावेळी सचिव डॉ. सचिन करोडपती यांनी महिला सक्षमता व सामाजिक कार्य यावर विचार मांडले. सदस्या राधिका करोडपती यांनी डर्री. च. णीवर पसश्रळीह महिला दिवस हा केवळ उत्सव नसून महिलांच्या संघर्ष, त्याग आणि यशाचा गौरव करण्याचा दिवस आहे असे सांगितले. प्राचार्या स्वाती बलखंडे यांनी महिलांचे समाजातील योगदान अधोरेखित केले. अध्यक्षीय भाषणात संस्थाध्यक्ष यु.एच. करोडपती यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी महिला सक्षमीकरणावर आधारित भाषणे, कविता व मनोगते व्यक्त केली.

## जळगाव बाजार समितीचे लकी टेलरसह ४ संचालकांचा भाजपात प्रवेश

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक लकी टेलर यांच्यासह चार संचालकांनी रविवारी नाशिक येथे राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश केला. या प्रवेशामुळे बाजार समितीमधील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलली असून भाजपचे आता स्पष्ट बहुमत झाले आहे.**



या चार संचालकांच्या प्रवेशामुळे बाजार समितीमधील भाजपच्या संचालकांची संख्या आता १० वर पोहोचली आहे. भाजपमध्ये प्रवेश केलेल्यांमध्ये माजी सभापती लक्ष्मण गंगाराम पाटील, तथा लकी टेलर, माजी उपसभापती राजू पाटील, संदीप पाटील आणि दिलीप पाटील यांचा समावेश आहे. या पक्षप्रवेशावेळी बाजार समितीचे विद्यमान सभापती सुनील महाजन देखील उपस्थित होते. या पक्षप्रवेशामुळे जळगाव बाजार समितीवर आता भाजपची मजबूत पकड झाली आहे. राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या बदलामुळे जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात मोठी चर्चा रंगली आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कामकाजावर आणि आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत आता जळगाव ग्रामीणमध्ये भाजपचे वर्चस्व दिसून येणार आहे.

## आनंदी जीवनासाठी कला गुण कौशल्य आत्मसात करावेत : डॉ.संजय पाटील



प्रतिनिधी । चोपडा

**विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी सदर कार्यशाळा महत्वाची असून प्रत्येक ठिकाणी कला गुण कौशल्य आत्मसात केल्यास यशस्वी होणे तसेच जीवन जगणे सोपे होईल,असे प्रतिपादन प्रमुख अतिथी डॉ. संजय पाटील यांनी केले. महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी.पाटील महाविद्यालय व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यशाळेच्या समारोप सोहळा कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव जिल्हा समन्वयक डॉ. संजय पाटील यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.**

या कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. संदीप पाटील,सचिव डॉ.स्मिता पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच विद्यार्थी विकास संचालक डॉ.चंद्रशेखर वाणी व धुळे जिल्हा समन्वयक विवेकानंद चव्हाण यांचे सहकार्य लाभले. या शिबिराच्या समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र.प्राचार्य डॉ. के.एन.सोनवणे उपस्थित होते. याप्रसंगी कार्यशाळा निरीक्षक डॉ.स्वप्निल खरे, डॉ.अजय पाटील, उपप्राचार्य प्रा.डॉ. आर. एम.बागुल, उपप्राचार्य प्रा.डॉ.ए.बी. सूर्यवंशी, समन्वयक डॉ.एस.ए.वाघ, प्र.रजिस्ट्रार डी.एम.पाटील, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ.डी.डी.कर्दपवार उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ.डी.डी. कर्दपवार यांनी केले. यावेळी विविध जिल्ह्यातील विद्यार्थी हिमांशु बागुल, प्रमोदकुमार चौरसिया, कक्षा देसले, गायत्री जाधव, निलेश भोई, प्रग्रेश झांबरे यांनी उत्कृष्ट आयोजन व नियोजनाबद्दल कौतुक केले. अध्यक्षीय मनोगत प्राचार्य प्रा. डॉ. के. एन. सोनवणे यांनी व्यक्त केले.सूत्रसंचालन डॉ. पी. एम. रावतोळे यांनी केले तर आभार डॉ. के. एस. क्षीरसागर यांनी मानले.

## जागतिक महिला दिनी कृतज्ञता सोहळा साजरा

प्रतिनिधी । चोपडा




येथील विवेकानंद विद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त इयत्ता सातवी 'बहिणाबाई' या वर्गातील २१ विद्यार्थिनी व शाळेतील सर्व शिक्षिकांनी शिक्षक राकेश विसपुते यांची आई व धर्मपत्नी यांचा गुलाब पुष्प व भेटवस्तू देऊन कृतज्ञता व्यक्त करत सन्मान केला.

८ मार्च रोजी जागतिक महिला दिन! हा दिवस म्हणजे केवळ कॅलेंडरमधील एक तारीख नसून, स्त्रीशक्तीच्या अफाट कर्तृत्वाचा, त्यांच्या संघर्षाचा आणि त्यांनी दिलेल्या योगदानाचा गौरव करण्याचा दिवस असल्याने हा गौरव करण्यात आला आहे.

आज आपण मागे वळून पाहिले, तर लक्षात येते की स्त्रीने जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आपले नाव सुवर्ण अक्षरांनी कोरले आहे. सावित्रीबाई फुलेंनी पेटवलेली ज्ञानाची ज्योत आज घराघरात प्रकाश पसरवत आहे. बदलते स्वरूप आणि आव्हाने, आजची स्त्री केवळ चूल आणि मूल पर्यंत मर्यादित नाही. ती डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षिका, सैनिक आणि उद्योजक म्हणून समाजाचा कणा बनली आहे. स्त्रीला केवळ सन्मानाची घोषणा नको आहे, तर तिला सुरक्षितता, समानता आणि स्वबळावर जगण्याची संधी हवी आहे, असे मत राकेश विसपुते यांनी व्यक्त केले.

## गोंभी येथे श्री भैरवनाथ महाराज यात्रोत्सव; बारा गाड्यांची परंपरा कायम

प्रतिनिधी । भुसावळ

तालुक्यातील गोंभी गावात सालाबादप्रमाणे यंदाही श्री भैरवनाथ महाराज यात्रोत्सवाचे आयोजन दि. ९ मार्च रोजी करण्यात आले होते.

या यात्रेनिमित्त पारंपरिक बारा गाड्यांचा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या धार्मिक सोहळ्यात भगत स्व.जगन्नाथ कोळी यांच्या आशीर्वादाने भगत विजय कोळी हे बारा गाड्या ओढण्यात आल्या. त्यांना बगले म्हणून राजेंद्र कोळी व जितेंद्र कोळी यांचे सहकार्य लाभले. यावेळी पोलीस पाटील वैशाली पाटील व सरपंच काजल कोळी यांची उपस्थिती लाभली होती.

## बौद्ध वधू वर परिचय मेळाव्यात २०० मुला-मुलींनी दिला परिचय

प्रतिनिधी । जळगाव

**बौद्ध समाजात विवाह जुळवून आणण्याकरिता चंद्रगुप्त सुरवाडे व चंदा सुरवाडे आयोजित ४ था वधू - वर परिचय मेळावा दि. ८ मार्च रोजी हातनुर सभागृहात उत्साहाने संपन्न झाला . या मेळाव्यात २०० मुला-मुलींनी परिचय करून दिला. महाराष्ट्र , मध्य प्रदेश, गोवा, कर्नाटक, गुजरात येथून काही मुलं, मुली आलेले होते.**




या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड.राजेश झाल्टे होते. यावेळी दिलीप सपकाळे, बापूराव पानपाटील, उमेश शिरसाठ, मायाबाई अहिरे उपस्थित होते. ॲड. झाल्टे म्हणाले की, समाजात परिचय मेळाव्यासोबत सामूहिक विवाह मेळावे घेणे गरजेचे आहे. त्याचबरोबर लग्नात अवास्तव पैसा खर्ची न करता भविष्यातील कौटुंबिक गरजा भागविण्यासाठी त्याचे नियोजन करावे, असा सल्ला त्यांनी दिला. प्रसिद्ध उद्योजक संजय इंगळे यांनी आजच्या काळात नोकरी, त्यातही सरकारी नोकरी मिळणे फारच कठीण आहे.तेव्हा मुला-मुलींनी नोकरी ही अपेक्षा बाळगू नये, असे मत मांडले. ज्या मुलीचे वडील हयात नाहीत अश्या मुलीच्या लग्नाकरिता १० हजार रुपयांची मदत एका नववधूला दिली. मेळाव्यात मुकुंद सपकाळे, जयसिंग वाघ, डॉ. मिलिंद बागुल यांची भाषणे झाली. प्रास्ताविक प्रा. डॉ. सत्यजित साळवे व सूत्रसंचालन कुमुद महाजन तर आभार सुभाष सपकाळे यांनी मानले. यशस्वितेसाठी अशोक तायडे, सुमेध नेतकर, चेतन नन्नवरे, शारदा इंगळे, रेखा तायडे, रत्नप्रभा तायडे, सायली दहिवेले, विजया सोनवणे, रजनी इंगळे, सुनीता पानपाटील यांनी परिश्रम घेतले.

## रोटरी सेंट्रलतर्फे महिलादिनी खेळाडूंना ट्रॅक सूट, टी-शर्ट, स्पोर्ट्स शूजचे वितरण

### महिला सदस्यांसह कष्टकरी महिलांचा सन्मान

प्रतिनिधी । जळगाव

**येथील रोटरी क्लब ऑफ जळगाव सेंट्रलतर्फे जागतिक महिला दिनानिमित्त एकलव्य स्पोर्ट्स अकॅडमीतील पोलीस भरतीसाठी सराव करणाऱ्या युवती आणि राज्य व राष्ट्रीय पातळीवर खेळलेल्या महिला खेळाडूंना ट्रॅक सूट, टी-शर्ट, स्पोर्टस शूजचे वितरण करण्यात आले.**




गणपती नगरातील रोटरी हॉलमध्ये झालेल्या कार्यक्रमास जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, महापौर दीपमाला काळे, अध्यक्ष जितेंद्र बरडे, मानद सचिव ॲड. केतन ढाके यांची प्रमुख उपस्थिती होती. सुधा शांती केंद्रातील १६ कष्टकरी महिलांच्या वतीने प्रातिनिधिक स्वरूपात शोभा बाविस्कर व अलका बडगुजर यांचा तसेच केंद्राच्या संचालिका अनिता वाणी, स्मिता करे, अलका सोनवणे यांचा सत्कार करण्यात आला. रोटरी सेंट्रलच्या सदस्या असलेल्या साधना दामले यांचा सामाजिक क्षेत्रातील कार्याबद्दल तर तृप्ती बाकरे यांना शैक्षणिक क्षेत्रातील कार्याबद्दल सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. महापौर काळे, एकलव्य स्पोर्ट्स अकॅडमीचे प्रा.डॉ. श्रीकृष्ण बेलोरकर व अध्यक्ष बरडे यांनी मनोगत व्यक्त केले. सीईओ करनवाल यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधला. ज्ञानचषक क्रिकेट स्पर्धेतील निधीतून हा सामाजिक उपक्रम साकारल्याबद्दल आयोजन समिती व क्रीडा समितीच्यावतीने प्रभुदास पटेल व श्यामलाल कुकरेजा यांनी सत्कार स्वीकारला. सूत्रसंचालन तृप्ती बाकरे यांनी तर आभार जितेंद्र अग्रवाल यांनी मानले. यशस्वीतेसाठी अनिता बरडे, पल्लवी ढाके,सोनल अग्रवाल, प्रमिला कुकरेजा, रवींद्र वाणी, डॉ. चंद्रकांत साळुंखे, वाणी यांनी परिश्रम घेतले.

## अहिंसक समाज निर्मितीसाठी व्यापक प्रयत्नांची गरज

### जैन हिल्स येथे सुरू असलेल्या 'पीस बिल्डर्स फोरम इंडिया'च्या बैठकीत उमटला सूर

प्रतिनिधी । जळगाव

**गांधी रिसर्च फाउंडेशन आणि एकता परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पीस बिल्डर्स फोरम इंडिया ही राष्ट्रीय बैठक जैन हिल्स येथे ८ मार्चपासून सुरु झाली. या बैठकीच्या दुसऱ्या दिवशी देश-विदेशातून आलेल्या शांतिदूतांनी अहिंसक समाज निर्मितीसाठी व्यापक प्रयत्नांची गरज व्यक्त केली.**




बैठकीत एकता परिषदेचे पी. व्ही. राजगोपाल यांनी आजच्या युगात खेळणी उद्योग, सोशल मीडिया आणि चित्रपट सृष्टी कशा प्रकारे तरुणांमध्ये हिंसेचा रोमांच निर्माण करत आहेत, याकडे लक्ष वेधले. राजगोपाल यांनी शांततापूर्ण समाजासाठी अहिंसक शासन व्यवस्था, अर्थव्यवस्था, शिक्षण आणि सामाजिक आंदोलने या चतुःसूत्रीचा आग्रह धरला. यावेळी गुजरातचे सामाजिक कार्यकर्ते संजयभाई यांनी २००२ च्या दंगलींनंतर संवाद आणि विश्वासाच्या जोरावर केलेल्या पुनर्वसनाचा अनुभव सांगितला. ज्येष्ठ पत्रकार रजनी बक्षी यांनी मुंबईतील मोहल्ला समितीच्या मॉडेलचा दाखला देत सामुदायिक स्तरावर विश्वास निर्माण करण्याची गरज व्यक्त केली. तर मणिपूरचे डॉ. देबेन यांनी राजकारण आणि शिक्षण व्यवस्था संविधानातील न्याय आणि समतेच्या तत्त्वांवर आधारित असल्यास हिंसेची शक्यता कमी होईल, असे नमूद केले. बैठकीत अबीदा, मृत्युंजय, अनंत गिरी, डॉ. कुप्पु स्वामी यांच्यासह इतरांनीही आपले विचार मांडले. कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय कार्यकर्त्या ललिता रामदास यांनी व्हिडिओ संदेशाद्वारे महिलांच्या भूमिकेवर भर दिला. जिल कॅर-हॅरिस यांनी वैयक्तिक बदलासोबतच संरचनात्मक बदलांसाठी महिलांनी नेतृत्व करण्याचे आवाहन केले. बैठकीत प्रशासकीय संवेदनशीलता, शाळांमधील पीस क्लब आणि शांती सेना यांसारख्या विषयांवरही सखोल चर्चा करण्यात आली.

## विटनेरचे दोन ग्रामपंचायत सदस्यांच्या अपात्रतेवर शिक्कामोर्तब

प्रतिनिधी । जळगाव

**तालुक्यातील विटनेर येथील दोन ग्रामपंचायत सदस्यांना शासकीय जागेवर अतिक्रमण केल्याप्रकरणी अपात्र ठरविण्याचा जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय नाशिकच्या अपर विभागीय आयुक्तांनी कायम ठेवला आहे. यामुळे सदस्य सागर ईश्वर दिवाणे आणि अर्चना दिनेश भगत या दोघांना आपले सदस्यत्व गमवावे लागले आहे.**

विटनेर येथील रहिवासी सुरेश बाबुलाल गोलांडे यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ च्या कलम १४ (१) (ज-३) नुसार जिल्हाधिकारी जळगाव यांच्याकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. या अर्जात त्यांनी असा आरोप केला होता की, ग्रामपंचायत सदस्य सागर दिवाण, अर्चना भगत यांनी सार्वजनिक जागेवर अतिक्रमण करून बेकायदेशीर बांधकाम केले आहे. या अर्जावर सुनावणी घेतल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी २५ फेब्रुवारी २०२५ रोजी दोन्ही सदस्यांना अपात्र घोषित करण्याचे आदेश दिले होते. तसेच विभागीय आयुक्तांनी अपिलार्थींचे अपील फेटाळून लावले.

# लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटणारे समाधान हेच शासनाच्या कार्याचे खरे यश : पालकमंत्री

## सोनवद येथे महसूल समाधान शिबिरात ना.गुलाबराव पाटील यांच्या हस्ते शासकीय सेवांचे वाटप

प्रतिनिधी । जळगाव

**शासनाचा खरा उद्देश म्हणजे सर्वसामान्य नागरिकांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवणे होय. शेतकऱ्यांच्या जमीनविषयक अडचणी दूर होणे, विद्यार्थ्यांना आवश्यक दाखले मिळणे किंवा एखाद्या कुटुंबाला घरकुलाचा लाभ मिळणे या क्षणांमधून लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटणारे समाधान हेच शासनाच्या कार्याचे खरे यश आहे, असे प्रतिपादन जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले. धरणगाव तालुक्यातील सोनवद बु. येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरात ते बोलत होते.**




धरणगाव तालुक्यातील सोनवद मंडळातील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे शनिवारी सकाळी भव्य महसूल समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा शुभारंभ पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. या शिबिराच्या माध्यमातून महसूल, कृषी, पंचायत समिती, आरोग्य तसेच इतर विविध विभागांच्या सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्या. त्यामुळे नागरिकांना विविध कामांसाठी शासकीय कार्यालयांच्या फेऱ्या मारण्याची गरज भासली नाही आणि गावपातळीवरच अनेक समस्या सोडविण्यात आल्या.

यावेळी बोलताना पालकमंत्री ना.गुलाबराव पाटील यांनी राज्य सरकारच्या शेतकरी हिताच्या निर्णयांचा उल्लेख केला. शासनाने दिलेला शब्द पाळत दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीची अंमलबजावणी करण्यात आली असून नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतल्याची माहिती त्यांनी दिली. शासन शेतकरी, गरीब आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी कटिबद्ध असून अधिकाऱ्यांनी संवेदनशीलतेने काम करत शासनाच्या योजना प्रत्येक पात्र घटकापर्यंत पोहोचवाव्यात, असेही त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी सांगितले की, शासनाच्या विविध योजना व सेवा नागरिकांपर्यंत वेळेत पोहोचविणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. महसूल समाधान शिबिरांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या अडचणी तातडीने सोडविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

**➤ या शिबिरात मोठ्या प्रमाणावर विविध प्रमाणपत्रे व योजनांचा लाभ नागरिकांना देण्यात आला. जात प्रमाणपत्र १४४, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र ११८, नवीन रेशन कार्ड २७, संजय गांधी योजना मंजूर प्रकरणे २८, वारस फेरफार ४२, कालबाह्य नोंदी कमी करणे ६३०, आयुष्मान भारत कार्ड ९ तसेच घरकुल लाभार्थी नमुना ८ चे १८ प्रकरणे मंजूर करण्यात आली. तसेच भूमी अभिलेख विभागामार्फत आठ गावांतील एकूण २८४० ड्रोन सर्वे सनदांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील पाटील यांनी केले, तर तहसीलदार महेंद्र सूर्यवंशी यांनी प्रास्ताविक केले. या कार्यक्रमाला विविध विभागांचे अधिकारी, पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

## चोपड्यात जागतिक महिलादिनी रेकी उपचार पद्धतीबाबत मार्गदर्शन



प्रतिनिधी । चोपडा

**येथे जागतिक महिला दिनानिमित्त माजी आमदार लताताई सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच लोकनियुक्त नगराध्यक्षा नम्रताताई पाटील, मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांच्या संकल्पनेतून रेकी उपचार पद्धतीबाबत मार्गदर्शन व सेमिनार आयोजित करण्यात आला होते.**

या कार्यक्रमात रेकी कोच श्रीमती समृद्धी रडे यांनी रेकी उपचार पद्धतीचे महत्त्व, आरोग्यावर होणारे फायदे तसेच दैनंदिन जीवनात त्याचा उपयोग याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. या सेमिनारमध्ये सुमारे १५० महिलांचा उत्स्फूर्त सहभाग नोंदविण्यात आला.

नगराध्यक्षा नम्रताताई पाटील म्हणाल्या की, आजच्या काळात महिला घराबरोबरच कामानिमित्त बाहेर पडत आहेत. त्यामुळे त्यांना शारीरिक थकव्याबरोबरच मानसिक ताण देखील जाणवतो. अशा परिस्थितीत रेकी उपचार पद्धती महिलांना मानसिक व शारीरिक ऊर्जा देण्यास उपयुक्त ठरू शकते. नगरपरिषदेतील सफाई कर्मचारी महिलांसाठी देखील ही पद्धत अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांनी महिलांनी रेकी उपचाराचा लाभ घेऊन दैनंदिन जीवनात त्याचा उपयोग करून आरोग्यदायी जीवनशैली स्वीकारावी, असे आवाहन त्यांनी केले.


कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन स्वच्छता निरीक्षक दीपाली साळुंके यांनी केले. या कार्यक्रमाला नगरसेविका भारती चौधरी, पूजा देशमुख, उपमुख्य अधिकारी संजय मिसर, करनिरीक्षक संदीप गायकवाड, शहर समन्वयक स्वप्निल धनगर आदी मान्यवर उपस्थित होते.

## थोडक्यात

### जागतिक किडनी दिनानिमित्त जळगावात गुरुवारी रॅली

**जळगाव ।** येथील आयएमए जळगाव शाखा, आरोग्यदीप किडनी फाउंडेशन, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जिल्हा सामान्य रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक किडनी दिनानिमित्त गुरुवार दि.१२ मार्च रोजी सकाळी १० वाजता जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. सर्वांसाठी किडनी आरोग्य हा संदेश घेऊन या रॅलीचा जिल्हा सामान्य रुग्णालय (सिव्हिल हॉस्पिटल) येथून प्रारंभ होऊन जिल्हाधिकारी कार्यालय येथे समारोप होणार आहे.

### जेडीसीसी बँकेचे सतीश पाटील यांना पितृशोक



**चोपडा ।** जेडीसीसी बँकेचे चोपडा शाखेचे सतीश जिजाबराव पाटील यांचे वडील माजी सरपंच जिजाबराव झिंगा पाटील तोरखेडा यांचे वृद्धापकाळाने नुकतेच निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे (वय ८२) वर्षे होत. त्यांच्या पश्चात ३ मुले, मुली, सुना नातवंडे असा परिवार आहे.

## जिल्ह्यात बालविवाह निर्मूलनाच्या प्रयत्नांना वेग




प्रतिनिधी । जळगाव

**भारत सरकारच्या महिला व बालविकास मंत्रालयाच्या वतीने राबविण्यात आलेल्या १०० दिवसांच्या तीव्र जनजागृती मोहिमेंतर्गत जळगाव जिल्ह्यात बालविवाह मुक्ती रथ मोहिमेद्वारे व्यापक जनजागृती करण्यात आली. या मोहिमेचा समारोप कार्यक्रम नुकताच पार पडला.**

या मोहिमेत आधार बहुउद्देशीय संस्था, जळगाव यांनी सक्रिय सहभाग घेत जिल्ह्यातील गावोगावी आणि शहरांमध्ये जाऊन बालविवाहविरोधी संदेश पोहोचवला. बालविवाहामुळे मुलींच्या आरोग्य, शिक्षण आणि भवितव्यावर होणारे गंभीर परिणाम तसेच बालविवाह हा कायद्याने दंडनीय गुन्हा असल्याची माहिती नागरिकांना देण्यात आली. ही मोहीम Just Rights for Children या देशातील २५० पेक्षा अधिक बालहक्क संस्थांच्या नेटवर्कच्या सहकार्याने राबविण्यात आली. देशातील ४३९ जिल्ह्यांमध्ये बालविवाह निर्मूलनासाठी बालविवाह मुक्ती रथाद्वारे जनजागृती करण्यात आली. जळगाव जिल्ह्यात या मोहिमेंतर्गत विविध गावे, शैक्षणिक संस्था आणि पंचायतस्तरावर जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले. तसेच नागरिकांना बालविवाह न करण्याची आणि न होऊ देण्याची शपथ देण्यात आली. पहिल्या टप्प्यात शाळा व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यात आली. दुसऱ्या टप्प्यात धार्मिक नेते तसेच विवाहाशी संबंधित सेवा पुरवठादार - केटरर्स, डेकोरेटर्स, बँड, हॉल मालक आदींना बालविवाहात सहकार्य न करण्याचे आवाहन करण्यात आले. तिसऱ्या टप्प्यामध्ये ग्रामपंचायतींमध्ये व्यापक जनजागृती उपक्रम राबविण्यात आले. या प्रसंगी आधार बहुउद्देशीय संस्थाच्या प्रतिनिधींनी सांगितले की, बालविवाह ही केवळ सामाजिक कुप्रथा नसून मुलींच्या हक्कांवर आघात करणारा गंभीर गुन्हा आहे. समाजातील सर्व घटकांच्या सहभागातून बालविवाहमुक्त जळगाव जिल्हा निर्माण करण्याचा संकल्प या मोहिमेद्वारे दृढ करण्यात आला.

## पंकज ग्लोबल पब्लिक स्कूलमध्ये वार्षिक पारितोषिक वितरण

प्रतिनिधी । चोपडा

**पंकज ग्लोबल पब्लिक स्कूल येथे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे दोन दिवस भव्य आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीचा गौरव करण्यासाठी आयोजित या समारंभाला पालक व मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली होती.**




या कार्यक्रमाला पंकज शैक्षणिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सुरेश बोरोले, अध्यक्ष पंकज बोरोले, उपाध्यक्ष अविनाश राणे, संचालक गोकुळ भोळे, हेमलताताई बोरोले व दीपालीताई बोरोले यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात ईशस्तवनाने झाली असून त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून समारंभाचे उद्घाटन करण्यात आले.

या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून आर.ए.पोद्दार मेडिकल कॉलेज, मुंबई येथे कार्यरत व नुकतेच २४ फेब्रुवारी २०२६ रोजी एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण झालेले मेडिकल ऑफिसर डॉ. कपिल पाटील, डॉ. नीलिमा चौधरी (असोसिएट प्रोफेसर, पंचकर्म विभाग, आरबी मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल, आग्रा), निवृत्त आर्मी ऑफिसर संतोष माळी, भरत राठोड, चोपडा नगरपालिकेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सागर मिसर, चोपडा तालुक्याचे पीएसआय सचिन चौधरी, नगरसेवक प्रवीण देशमुख, एमएसईबीचे अभियंता संदीप महाजन, रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष अॅड. रुपेश पाटील, भौतिकशास्त्र तज्ञ प्रकाश देशमुख, गोपाल बारेला, शुभांगी पाटील, दीपेश बडगुजर, कविता कोळी तसेच शाळेचे प्राचार्य मिलिंद पाटील आदी उपस्थित होते. या समारंभात विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल पारितोषिके प्रदान करण्यात आली.

संकेत गांगुर्डे यांनी देखील विद्यार्थ्यांना व पालकांना शिवचरित्राविषयी प्रेरणादायी माहिती देऊन त्यांना उत्साहित केले. डॉ. कपिल पाटील, डॉ. सुरेश बोरोले यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन शुभांगी पाटील व स्वाती शिंदे यांनी केले.

### आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्ताने कर्तृत्ववान माजी विद्यार्थिनींचा झांबरे विद्यालयात सत्कार

प्रतिनिधी । जळगाव

ए.टी झांबरे विद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा मोठ्या उत्साहात व आनंदात पार पडला. या मेळाव्याला २००३ -२००४ या वर्षांत या शाळेत शिक्षण घेतलेले माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अनेक वर्षांनी आपल्या शाळेत आणि मित्रमैत्रिणींना भेटण्याचा आनंद सर्वांच्या चेहऱ्यावर दिसत होता. मुख्याध्यापिका प्रणिता झांबरे व पर्यवेक्षक नरेंद्र पालवे यांनी माजी विद्यार्थ्यांचे सन्मान चिन्ह देत स्वागत केले.

## मूकबधिर विद्यालयात जागतिक महिला दिन साजरा

प्रतिनिधी । चोपडा

**स्व.तुळसाआई बहुउद्देशीय महिला मंडळ, विटनेर संचालित मूकबधिर विद्यालय चोपडा येथे ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे आधारस्तंभ भावलाल पाकळे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून विद्यार्थी, पालक, महिला उपस्थित होते.**



सुरुवातीला सर्वांना महिला दिनाच्या शुभेच्छा देऊन थोर महिलांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. तद्नंतर पाहुण्यांचे व विद्यालयातील सर्व कर्मचारी यांचे पुष्प गुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. श्रीमती मिनाक्षी पाकळे यांनी आजच्या महिला दिनाचे महत्व सांगून मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशेष शिक्षिका अश्विनी पाकळे यांनी केले. त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष भावलाल पाकळे यांनी मनोगत व्यक्त केले. शेवटी कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन शाळेचे वसतिगृह अधिक्षक वैशाली पाकळे यांनी करून कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमास विद्यालयातील सर्व शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरात १०० लाभार्थ्यांना लाभ

## गोरगावले बुद्रुक येथे आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे यांची खास उपस्थिती : ११५ डिजिटल सातबारा वाटप

प्रतिनिधी । चोपडा

**महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या दि. १८ फेब्रुवारी २०२५ च्या शासन निर्णयानुसार, गतिमान प्रशासन व आपत्कालीन व्यवस्थेचे बळकटीकरण योजनेअंतर्गत दि. ७ मार्च रोजी गोरगावले बुद्रुक येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर आमदार प्रा.चंद्रकांत सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. त्यात १०० लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ देण्यात आला असून सुमारे ११००नागरिकांनी हजेरी लावली.**




यावेळी कृषी उत्पन्न बाजार समिती नरेंद्र पाटील, अॅड. शिवराज पाटील, प्रांताधिकारी मयूर बंगाळे, तहसीलदार भाऊसाहेब थोरात, सहाय्यक गटविकास अधिकारी अनिल विसावे, तालुका कृषी अधिकारी दीपक साळुंखे, पोलीस निरीक्षक मधुकर साळवे यांसह सर्व कार्यालय प्रमुख व अधिकारी, सरपंच व सदस्य यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विविध विभागांच्या स्टॉलमध्ये शासकीय योजनांचा प्रचार आणि प्रसार करून अर्ज भरून घेण्यात आले. यावेळी प्राथमिक स्वरूपात सुमारे १०० लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ देण्यात आला. महसूल विभाग अंतर्गत डिजिटल सातबारा वाटप ११५, लागवडीखाली आणणे- ५६, जिवंत सातबारा अंतर्गत वारस नोंदी मंजूर करून सातबारा वितरण- ३६, पुरवठा शाखा-११२ नवीन/दुबार शिधापत्रिका, डिजिटल शिधापत्रिका, संगायो शाखा- २३६ लाभार्थ्यांची डीबीटी प्रक्रिया पूर्ण, ५६ हयात प्रमाणपत्रे,२२ नवीन अर्ज, ई केवायसी करणे २१, सेतु शाखा- ३३५ उत्पन्न, ८५ राष्ट्रीयत्व, २२७ रहिवासी, ४२ जातीचे दाखले वाटप, ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र- ६९, आधार नोंदणी-२८, आधार सुधारणा-३४, पंचायत समिती- ५ जलतारा योजनेला प्रशासकीय मान्यता, जन्म व मृत्यू नोंद आदेश- ३०, मजुरांची ई केवायसी- ३५ आणि बालविकास विभाग - ६ लाभार्थ्यांना बेबी कीट वाटप करण्यात आले. तालुका आरोग्य विभाग-जननी सुरक्षा योजना- ८ लाभार्थींना लाभ वाटप, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना- ६ लाभार्थींना लाभ वाटप, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना- १३ लाभार्थ्यांना लाभ, संजय गांधी योजना- ३८ लाभार्थ्यांना लाभ, कृषी विभाग- फळबाग लागवड योजना- ५ लाभार्थी, यांत्रिकीकरण योजनेंतर्गत ट्रॅक्टर हार्वेस्टर १२ वाटप करण्यात आले. यावेळी तहसीलदार भाऊसाहेब थोरात व तालुका कृषी अधिकारी दीपक साळुंखे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन भूषण पाटील व आभार नायब तहसीलदार योगेश पाटील यांनी मानले.

## कोळीजमातीच्या उपवर-वधुंसाठी ११ मे रोजी सामूहिक विवाह सोहळा

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यातील आदिवासी कोळी लोकांच्या विवाहेच्छुंक उपवर-वधूंसाठी सालाबादप्रमाणे ह्यावर्षीही कोळी समाज बहुउद्देशीय प्रतिष्ठानच्यावतीने ११ मे रोजी जळगाव येथील सरदार वल्लभभाई पटेल मंगल कार्यालय येथे मोफत सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले आहे.**

याबाबत नुकतीच प्रतिष्ठानची बैठक घेण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी जळगावचे माजी नगराध्यक्ष चत्रभुज सोनवणे व मार्गदर्शक जगन्नाथ बाविस्कर (संपर्क प्रमुख - कोळी मंडळ,चोपडा) यांची उपस्थिती होती. मागील तीन वर्षांपासून दरवर्षी मे महिन्यात हा सामूहिक विवाह सोहळा मोठ्या थाटामाटात व उत्साहात संपन्न होत असतो. याआधी पन्नास पेक्षाही जास्त उपवर वधूंचे विवाह प्रतिष्ठानतर्फे मोफत लावण्यात आलेले आहेत. सर्व स्तरातील दानशूर व्यक्ती व संस्था संघटनांच्या सहकार्याने हा विवाह सोहळा संपन्न होत असतो. वधू-वरांना लग्नड्रेस, बूट-चप्पलसह संसारोपयोगी वस्तू भेट देण्यात येतात. विवाह नोंदणी संस्थेचे श्री शनि मंदिरासमोरील कार्यालयात ३० एप्रिलपर्यंत करण्यात येणार आहे. गरजु कोळीजमात बांधवांनी ह्या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आलेले आहे.